स्थानिक स्वराज्य संस्थां निवडणूक अनपेक्षित परिस्थिती हाताळण्याबाबत कायद्याचे अग्रक्रम...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.- रानिआ-२०१६/अहाका/प्र.क्र. १० /सं.क,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०१६.

## आ दे श

भारतीय संविधानातील तरतुदी व लोकसभा व विधानसभेने पारित केलेले अधिनियम/नियमाप्रमाणे लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगाकडून घेण्यात येतात. मात्र निवडणुकीच्यावेळी उदभवणाऱ्या सर्व अनेपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी या अधिनियम / नियमामध्ये तरतुदी करणे शक्य नसल्याने, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ मध्ये भारत निवडणूक आयोगाला आवश्यक ते सर्व अधिकार (Plenary Powers) देण्यात आलेल्या आहेत जेणेकरुन निवडणुकांच्यावेळी उद्धवलेली कोणतीही अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी भारत निवडणूक आयोग पूर्णपणे सक्षम आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत श्री. मोहिंदरसिंग गिल वि. मुख्य निवडणूक अधिकारी व इतर (AIR १९७८/८C/१५१) यामध्ये आदेश पारित करताना खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत :-

"The framers of the constitution took care to leaving scope for exercise of residuary power by the Election Commission in its own right, as a creature of the Constitution, in the infinite variety of situations that may emerge from time to time in such a large democracy as ours. Every contingency could not be foreseen or anticipated with precision. That is why there is no hedging in Art. 324. The Commission may be required to cope with some situation which may not be provided for in the enacted laws and the rules. That seems to be the raison deter for the opening clause in Arts. 327 and 328 which leave the

exercise of powers under Art. 324 operative and effective when it is reasonably called for in a vacuous area. Where the existing laws are absent and yet a situation has to be tackled, the CEC has not to fold his hands and pray to God for divine inspiration to enable him to exercise his functions and to perform his duties or to look to any external authority for the grant of powers to deal with the situation. He must lawfully exercise his power independently, in all matters relating to the conduct of elections, and see that the election process is completed properly in a free and fair manner."

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकासुध्दा निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानामध्ये १९९२ साली दुरुस्ती करण्यात आली असून प्रत्येक राज्यामध्ये एका स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हील ॲप्लिकेशन क्र.५७५६/२००५ (किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) मध्ये दि.१९/१०/२००६ रोजी राज्य निवडणूक आयोग यांचा दर्जा, अधिकार व स्वायत्तता इ.बाबत स्पष्ट आदेश पारित करताना खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे :-

**"राज्य निवडणूक आयुक्त यांचा दर्जा, शक्ती व अधिकार भारत निवडणूक आयोगाशी समकक्ष आहेत."**

**"निवडणुकीच्यावेळी उदभवलेली कोणतीही अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी भारत निवडणूक आयोगाप्रमाणे (भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४), राज्य निवडणूक आयोगाला (अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए नुसार) सर्व अधिकार प्राप्त आहेत."**

४. राज्यामध्ये असणाऱ्या २८,००० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दर पाच वर्षांनी सुमारे २,५०,००० लोकप्रतिनिधी राज्य निवडणूक आयोगाकडून निवडून दिले जातात. राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणुकीची जबाबदारी अनेक स्तरावर अनेक अधिकारी पार पाडतात. उदा. मतदान केंद्राध्यक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त इत्यादि. या निवडणुकांच्यावेळी उदभवणारी अनपेक्षित परिस्थितीबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियम/नियमांमध्ये स्पष्ट तरतुदी नसल्याने, त्या परिस्थितीत कोणता निर्णय घ्यावा, याबाबत

निवडणुकीशी निगडीत अधिकाऱ्यांच्या मनात काही संभ्रम आहे. म्हणून राज्य निवडणूक आयोग संविधानातील अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, चे कलम १८ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४(४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९५९ चे कलम ९ए (४), आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १०ए (४) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

५.१ निवडणुकीच्यावेळी उदभवणारी अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी निवडणुकीशी निगडित सर्व अधिकाऱ्यांनी खालील अग्रक्रमाप्रमाणे कायद्यातील तरतुदींचे पालन करावे :

(i) संविधानातील तरतुदी,

(ii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता अधिनियम व नियम यामधील तरतुदी,

(iii) मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाचे निर्णय,

(iv) राज्य निवडणूक आयोगाने पारित केलेले आदेश, सूचना, इत्यादी.

५.२ उदभवलेली परिस्थिती जर वरील आदेश/तरतूद इत्यादीप्रमाणे हाताळणे शक्य नसेल तर संबंधित अधिकारी यांनी मा. राज्य निवडणूक आयोगास आपल्या अभिप्रायासह अहवाल त्वरित पाठवून आयोगाचे आदेश घ्यावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( एस. एम. चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई.

४. सर्व विभागीय आयुक्त, (कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर)
५. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
८. मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
९. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)
१०. निवड नस्ती.